# १.३) उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (एच.एस.सी. व्होकेशनल) (पूर्वीचे एम.सी.व्ही.सी.)

**१.३.१** केंद्र शासनाच्या १९८६ च्या शैक्षणिक धोरणानुसार " शिक्षणाच्या विविध स्तरावर व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना रोजगार / स्वयंरोजगारास आवश्यक कौशल्य प्रदान करण्यात यावेत, जेणेकरुन आवड, गरजेनुसारइतर पर्याय उपलब्ध नाहीत म्हणून उच्च शिक्षणाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांचा लोंढा कमी होईल." अशी शिफारस करण्यात आली आहे.

त्यानुसार राज्यात १९८८-८९ पासून रोजगार स्वयंरोजगारास उपयुक्त असलेले ७०% व्यवसाय विषयांची व्याप्ती असलेले उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यात आले.

**१.३.२ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम योजनेंतर्गत राबविण्यात येणारे विविध अभ्यासक्रमात खालील विषयांचा समावेश होतो.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | प्रथम भाषा - इंग्रजी (अत्यावश्यक) | १०० गुण | | **३०%** |
| २) | द्वितीय भाषा | १०० गुण | | |
| ३) | पायाभूत अभ्यासक्रम | १०० गुण | | |
| ४) | व्यवसाय विषय पेपर - १ | २०० गुण | (८० सैधां + १२० प्रा.) | **७०%** |
| ५) | व्यवसाय विषय पेपर - २ | २०० गुण | (८० सैधां + १२० प्रा.) | |
| ६) | व्यवसाय विषय पेपर - ३ | २०० गुण | (८० सैधां + १२० प्रा.) | |
| | | | २४० सैधां. ३६० प्रा. | |
| | एकूण | ९०० गुण | | |

टिप - व्यवसाय विषयांचे २०० गुणांचे १०० गुणात रुपांतर करुन ३०० गुणांच्या व्यवसाय विषयांसह एकूण ६०० गुणांची गुणपत्रिका इयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना देण्यात येते. सदर अभ्यासक्रमामध्ये १/३ कालावधी सैधांतीक तासिकांसाठी तर २/३ तासिका प्रात्यक्षिकांसाठी असल्यामुळे आवश्यक कौशल्य अधिक चांगल्या प्रकारे विकसित होतात.

**१.३.३प्रवेश व परिक्षा :-**

इ. १० वी उत्तीर्ण किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाने शैक्षणिक अर्हता निश्चित केल्यानुसार विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमास प्रवेश देण्यांत येतो. तसेच सदर अभ्यासक्रमाची इ. १२ वी ची अंतिम परिक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यांत येते. तसेच उत्तीर्ण विद्यार्थ्यांना परिक्षा मंडळाच्या प्रमाणपत्राबरोबर संस्थेकडून व्यवसाय अभ्यासक्रमाच्या उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र देण्यात येते.+२ स्तरावरील योजने अंतर्गत तांत्रिक गट, वाणिज्य गट, शेतकी गट, मत्स्य गट, आरोग्य व अर्धवैद्यकीय सेवा गट व गृहविज्ञान गट अशा सहा गटातून एकुण ३० व्यवसाय अभ्यासक्रम शिकवण्यांत येतात, (यादी **परिशिष्ठ - १**) त्यापैकी २६ अभ्यासक्रम शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९८६ अंतर्गत "व्होकेशनल टेक्निशियन" निर्देशित असून २ अभ्यासक्रम हे ट्रेड ॲप्रेन्टिस खाली येतात. अभ्यासक्रमाची यादी **परिशिष्ठ २** मध्ये देण्यात आली आहे.